पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६७**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १८/०३/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.१८/०३/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**

२. मा.संतोष बबन कांबळे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती** – सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा बुधवार दिनांक ०६/०५/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १६७**
(सभावृत्तांत)
( दिनांक १८/०३/२०२० ची तहकूब सभा )

**दिनांक – ०६/०५/२०२०** **वेळ – दु. ०२.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **१८/०३/२०२०** तहकूब सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०२०** रोजी दु.**०२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**

या शिवाय मा.उल्हास जगताप **–** नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती** – सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा बुधवार दिनांक ०८/०५/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६७**

(सभावृत्तांत)

( दिनांक १८/०३/२०२० व ०६/०५/२०२० ची तहकूब सभा )

**दिनांक – ०८/०५/२०२०** **वेळ – दु. ०२.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **०६/०५/२०२०** ची तहकूब सभा शुक्रवार दि.**०८/०५/२०२०** रोजी दु.**०२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.कदम शशिकांत गणपत
८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
९. मा.संतोष बबन कांबळे
१०. मा.अभिषेक गोविंद बारणे
११. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१४. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.निकम, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.चव्हाण, मा.गलबले, मा.मोरे – कार्यकारी अभियंता, मा.माने – लेखाधिकारी, पीएमपीएमएल - हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक १२/०२/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६०) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०६/०३/२०२० रोजी दु.१२.३० व दि.११/०३/२०२० दु.०२.१५ वा.रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६५) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ११/०३/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६६) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७००६ विषय क्रमांक – १
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/१९९/२०२०, दि.०६/०३/२०२०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.78/1/2019-20 अन्वये प्रभाग क्र.६ मध्ये लांडगेवस्ती, सदगुरुनगर, चक्रपाणी वसाहत, महादेवनगर व परिसरामध्ये पावसाळी गटरची सुधारणा करणेकामी मे.भैरवनाथ कन्स्ट्रक्शन नि.र.रू.30,35,783/- (अक्षरी र.रु.तीस लाख पस्तीस हजार सातशे त्र्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,46,924/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,46,924/- पेक्षा 29.07% कमी म्हणजेच र.रु.20,90,253/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.33,249/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.55,610/- = एकुण र.रु.21,79,112/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००७ विषय क्रमांक – २
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे पत्र क्र.माजंस/२/कावि/१२९/२०२०, दि.०७/०३/२०२०

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय यांनी महानगरपालिकांतर्गत Ease of Living (EoL), Municipal Performance Index (MPI) व Data Maturity Assessment Framework (DMAF) 2019 इत्यादी अभियाने चालू केलेली आहेत. यास्तव शहरांद्वारे डेटा अपलोड करण्यासाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल तयार करण्यात आलेले आहे. याआधारे गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालयाने या Ease of Living (EoL) व Municipal Performance Index (MPI) 2019 चा अभ्यास सुरू केला आहे. Citizen Perception Survey हा इज ऑफ लिव्हिंग इंडेक्स

(30%weightage) चा अविभाज्य घटक आहे.ज्यामध्ये २.५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांकडून महानगरपालिकेच्या सेवेबाबतमत जाणून घेण्याचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालयातर्फे शहरातील नागरिकांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने नागरिकांसाठीEase of Living Index 2019 हे अभियान चालू केलेले असून प्रत्येक शहरांनीयाचा पाठपुरावा करण्यासाठी IEC Plan for cities तयार केला आहे. गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालयाने दि.२८/०१/२०२० रोजी पाठविलेल्या ई मेल मध्ये IEC Plan for cities अंतर्गत करावयाच्या सोशल मीडिया, आऊटडोअर ॲडव्हर्टायझिंग आणि आणि प्रेस / मीडिया संबंधित करावयाच्या कामांविषयी सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार आदेश क्र.मातवि/११/ कावि/९/२०२०, दि.३०/०१/२०२० अन्वये विविध विभांगांसाठी कामकाज वाटप केले आहे. त्यानुसार माहिती व जनसंपर्क विभागाकडे संपूर्ण अभियानाची जाहिरात प्रसिध्दी करणेचे कामकाज सोपविण्यात आलेले आहे. तदनुसार महापालिकेने शहरामध्ये विविध ठिकाणी पथनाट्ये सादर करणे, मोबाईल एलईडी वाहनाव्दारे प्रसिध्दी करणे, रेडिओ जिंगल्स, निवासी गृहनिर्माण संस्था व त्यातील उदवाहने यांव्दारे प्रसिध्दी करणे, सुमारे ५०० रिक्शा वुड्सवर जाहिरात करणे, स्काय बलूनद्वारे प्रसिद्धी, मनपा मुख्यालय येथे रांगोळी तसेच पत्रकार परिषदेचे आयोजन करणे इ. उपक्रम राबवून अभियानाची जाहिरात थेट पध्दतीने करणेत येणार आहे. याकामी सुमारे र.रु.२०,८१,६४०/- (अक्षरी र.रू.वीस लाख ऐक्यांशी हजार सहाशे चाळीस फक्त) अपेक्षित खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००८ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षेका/अ१५/कावि/१६७/२०२०, दि.०९/०३/२०२०

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नागरिकांना डेंग्यू, मलेरिया, चिकून गुण्या या आजाराची लागण होऊ नये म्हणुन प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन औष्णिक धुरिकरण करणेकामी डिझेलवर चालणारे दोन तीन चाकी रिक्षा टेम्पो भाड्याने घेणेकामी श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांना कक्षे/आ१५/कावि/४९१/२०१८ दि.०६/१२/२०१८ अन्वये दि.२४/११/२०१८ ते दि.२३/११/२०१९ अखेर २ वर्षे कालावधीसाठी कामाचा आदेश देणेत आलेला होता. सदर कामाचा कालावधी संपल्याने सदर ठेकेदार यांना 1 वेळा मुदतवाढ देणेत आलेले होती. दि.२३/०२/२०२० रोजी मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आला आहे. श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांना मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.आमुका/११/कावि/७८/२०२० दि.१७/०१/२०२० अन्वये काळ्या यादीत टाकणेत आले असल्याने नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर संस्थेस पुन्हा मुदतवाढ देणे शक्य नाही. क क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागामार्फत औष्णिक धुरीकरण करण्यासाठी वॅन फॉग मशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेलवर चालणारे तीन चाकी रिक्षा टेम्पो वाहन चालकासह भाड्याने घेणेबाबत. (चार रिक्षा टेम्पो) ची नविन निविदा नोटीस (ई टेंडरिंग पध्दतीने) क्रं.१/२०१९-

२०२० प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर निविदा ची कार्यवाही पुर्ण होणेकरीता काही कालावधी लागणार असल्याने क-क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीणभाग, दाट लोकवस्तीव भौगोलिक विस्तार पहाता नागरी आरोग्याच्या दुष्टीने डेंग्यु, मलेरीया, चिकुन गुण्या, हिवताप या आजाराचा प्रादुर्भाव टाळणे कामी दैनंदीन औष्णिक धुरीकरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी सध्याच्या कामाची निकड पहाता अ, ब, ड, ई, फ, ग व ह प्रभागातील औष्णिक धुरिकरण करणारे निविदाधारकांकडुनच सध्या कामकाज करीत असलेल्या प्रभागातील दरानुसारच संबधीत ठेकेदार यांचेकडुन नविन निविदा ची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कामकाज करून घेणे सोईचे होईल. अ, ब, ड, ई, फ, ग व ह कार्यालयाकडील काम करीत असेलल्या फ-क्षेत्रिय कार्यालयाकडील ठेकेदार मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्यागीक सेवा.सहकारी संस्था. मर्या. यांनी र.रू.५३९/- प्रति दिन प्रती टेम्पो कामकाज करणेस तयार असलेबाबत दि.04/03/2020 राजीच्या पत्रान्वये सहमती दर्शविलेली आहे.सदर संस्थेकडुन वाहने उपलब्ध करून घेवून त्या उपलब्ध तीन वाहनांच्या वाढीव खर्चास तीन महिन्याकरीता प्रति दिवस प्रति वाहन र.र.५३९/- प्रमाणे १ वाहनाचे २६ दिवसाचा खर्च र.रु.१४,०१४/- तीन वाहनाचे र.रु.४२,०४२/- प्रमाणे तीन महीन्यासाठी येणा-या खर्च र.रू.१,२६,१२६/- (अक्षरी र.रू.एक लाख सव्वीस हजार एकशे सव्वीस फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००९ | विषय क्रमांक – ४

दिनांक – ०८/०५/२०२० | विभाग– झोपडपट्टी पुर्नवसन व निर्मुलन

सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/६/कावि/२०/२०२०, दि.०९/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

झोपडपट्टी निर्मुलन व पुर्नवसन विभागाकडील वाहन.क्र.एम-एच-१४ सीएल-०३२१ टाटा मान्झा वाहनास नवीन टायर खरेदी करावयाचे असल्याने त्याबाबत कार्यशाळा विभागामार्फत अभिप्राय घेतला आहे. तरी यापुर्वी सदर वाहनास ९९१३५ या धावसंख्येस नवीन टायर बसविले होते व कार्यशाळा विभागाच्या अभिप्रायानुसार वाहनाची एकूण धावसंख्या १३९२७५ झाली असून टायर बसविलेपासून ४०१४० धाव वाहनाची झाली असून नवीन टायर बसविणे आवश्यक आहे. कार्यशाळा विभागाकडील परिपत्रक क्र.काशा/भां/कावि/१२८/०४ दि.३१/०३/२००४ नुसार वाहनाची धावसंख्या ४०००० कि.मी झालेली असावी व मे.सीएट लि. या टायर उत्पादित कंपनीचे कोटेशन (प्रोफॉर्मा इनव्हॉईस) घेतले असावे तदनंतर टायर खरेदीची कार्यवाही करावी त्यानुसार मे.सीएट लिमिटेड उरूळी पुणे येथील कार्यालयातून (डी.जी.एस ॲण्ड डी) रेट कॉन्ट्रॅक्टचे प्रोफॉर्मा इनव्हॉईस क्र.२०७ दि.०४/०३/२०२० रू.१७,४०८/-(अक्षरी र.रू.सतरा हजार चारशे आठ फक्त) सर्व करांसह इतक्या रकमेचे ४ नग टायरचे कोटेशन प्राप्त करून घेतले असून मे.सीएट टायर,उरूळी पुणे यांना अगाऊ रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०१० विषय क्रमांक – ५

दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ– मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क/१५/कावि/७२/२०२०, दि.११/०३/२०२०

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ३) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०११ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ– मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क/१५/कावि/७१/२०२०, दि.११/०३/२०२०

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालय, विद्युत विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्तीप्रमाणे संबधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०१२ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.डक्षेका/३/कावि/५६/२०२०, दि.११/०३/२०२०

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड क्षेत्रीय कार्यालय, विद्युत विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ५) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०१३ विषय क्रमांक – ८
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – लेखा
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/५७/२०२०, दि.११/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मुख्य लेखापरिक्षक यांनी मुलेप/कावि/१८/२०२० दि.२६/०२/२०२० अन्वये लेखा परिक्षण अहवाल सादर केलेला असून सन २०१८–१९ ची संचलन तूट र.रु.२४७.०४ कोटी असल्याचे अहवाल प्रमाणित केला आहे व त्यास मा.स्थायी समिती ठराव क्रं.६८५३ दि.२८/०२/२०२० अन्वये सदर संचलन तूट लेखापरिक्षण अहवालाचे अवलोकन करण्यात आले आहे. त्यानुसार एकूण संचलनतूट र.रु.२४७,०४,००,०००/- (अक्षरी र.रु.दोनशे सत्तेचाळीस कोटी चार लाख फक्त) मधून ४०% प्रमाणे र.रु.९८,८१,६०,०००/- पैकी संचलनतूट र.रु.६६,००,००,०००/- कोटी पीएमपीएमएल यांना अदा करणेत आली असून उर्वरीत संचलनतूट र.रु.३२,८१,६०,०००/- अदा करावयाचे आहेत. सन २०१८-१९ मध्ये देय होणारी संचलनतूट समायोजित करुन उर्वरीत संचलनतूट र.रु.३२,८१,६०,०००/- (अ.र.रु. बत्तीस कोटी ऐक्याऐंशी लाख साठ हजार फक्त) अदा करणेस तसेच सदरचा खर्च लेखा विभागाकडील सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकातील पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०१४ विषय क्रमांक – ९
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – जलशुध्दीकरण केंद्र से.२३
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आभा/कावि/२६/२०२०, दि.१२/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहराकरिता पवना धरणातून टप्पा क्र. ४ साठी ४८.५७६ द.ल.घमी पाणी पुनःआरक्षित करणेस शासन निर्णय क्र.बि.सिं.आ/२०१८/(३९१/१८)/सिं.व्य(धो) दि.२४/१०/२०१८ व शासन निर्णय क्र. बि.सिं.आ./२०१८/(३९१/१८)/सिं.व्य.(धो) दि.१३/११/२०१८ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपास पत्र मु.अ.(जसं)/(४४/२०१८) प्रशा-८/१११ दि.०७/०१/२०१९ व पत्र जा.क्र./खपावि/बिंसी/ इरादापत्र /५३१/सन २०१९ अन्वये ज्ञापन व इरादा पत्र देण्यात आले आहे. सदर ज्ञापनातील सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे तसेच उपरोक्त आरक्षणापोटी सिंचन पुनर्स्थापनेसाठी रु. ५०४०.१९ लक्ष पैकी (शासन निर्णयातील अ.क्र.६ आणि प्रदेश कार्यालयाचे ज्ञापन नुसार महानगरपालिकेस सिंचन पुनर्स्थापना खर्च एक रकमी भरणे बंधनकारक करणे ऐवजी सन २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षात टप्प्याटप्प्याने घेणेत यावा असे नमुद आहे.) सन २०१८-१९ साठीच्या सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी रु. १०,०८,०३,०००/- व दोन महिन्याची पाणीपट्टी अनामत रक्कम रु. ५३,५७,९९९/- चे धनाकर्ष पाटबंधारे विभागाकडे दिनांक ३१/०३/२०१९ रोजी जमा करणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने सन २०१९-२० चा सिंचन पुनर्स्थापना खर्चाचा दुसरा हप्ता र.रु.

१०,०८,०३,०००/- भरणा करणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकात "पाणीपुरवठा विशेष योजना निधीत अ.क्र.१ – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक्त (Source) स्त्रोत निश्चित करणे. त्यातील पाणी साठा आरक्षित करणे व तदनुषंगिक कामे करणे" या कामाअंतर्गत करण्यात आली आहे.तरी, वरील नमुद प्रमाणे पवना धरणातून टप्पा क्र. ४ साठी ४८.५७६ दलघमी पाणी आरक्षणापोटी सिंचन पुनर्स्थापनेसाठी रु. ५०४०.१९ लक्ष पैकी (शासन निर्णयातील अ.क्र.६ आणि प्रदेश कार्यालयाचे ज्ञापन नुसार महानगरपालिकेस सिंचन पुनर्स्थापना खर्च एकर क्कमी भरणे बंधनकारक करणे ऐवजी सन २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षात टप्प्याटप्प्याने घेणेत यावा असे नमुद आहे) सन २०१९-२० साठीच्या दुस-या टप्प्यात सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी र.रु.१०,०८,०३,०००/-(अक्षरी र .रु.दहा कोटी आठ लाख तीन हजार फक्त) चा धनादेश कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०१५ विषय क्रमांक – १०
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – जलशुध्दीकरण केंद्र से.२३
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आभा/कावि/२५/२०२०, दि.१२/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहराकरिता आंद्रा धरणातून ३६.८७ दलघमी. पाणी पुनःआरक्षित करणेस शासन निर्णय क्र.बि.सिं.आ/२०१८/(३९१/१८)/सिं.व्य(धो) दि.२४/१०/२०१८ व शासन निर्णय क्र.बि.सिं.आ./२०१८/(३९१/१८)/सिं.व्य.(धो) दि.१३/११/२०१८ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपास पत्र मु.अ.(जसं)/ (४४/२०१८) प्रशा-८/१११ दि.०७/०१/२०१९ व पत्र पुपावि/प्रशा-१/बि.सिं./पिं.चिं.मनपा /इरादापत्र/३४७/सन २०१९ अन्वये ज्ञापन व इरादा पत्र देण्यात आले आहे. सदर ज्ञापनातील सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे तसेच उपरोक्त आरक्षणापोटी सिंचन पुनर्स्थापनेसाठी रु.१००,८०,२५,८५६/- पैकी (शासन निर्णयातील अ.क्र.६ आणि प्रदेश कार्यालयाचे ज्ञापन नुसार महानगरपालिकेस सिंचन पुनर्स्थापना खर्च एकरक्कमी भरणे बंधनकारक करणे ऐवजी सन २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षात टप्प्याटप्प्याने घेण्यात यावा अशा सूचना असल्यामुळे) सन २०१८-१९ साठीच्या सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी र.रु.२०,१६,०५,१७२/- तसेच दोन महिन्याची पाणीपट्टी अनामत र.रु.२०,३३,४०५/- व जलमापन यंत्रासाठी रु.२,००,०००/- ची अनामत रक्कम असे एकुण अनामत र.रु.२२,३३,४०५/- चे धनाकर्ष पाटबंधारे विभागाकडे दि.३१/०३/२०१९ रोजी जमा करणेत आलेले आहे. याअनुषंगाने सन २०१९-२० चा सिंचन पुनर्स्थापना खर्चाचा दुसरा हप्ता र.रू.२०,१६,०५,१७२/- भरणा करणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ व सन २०१९-२० सुधारित अंदाजपत्रकात पान क्र.२३८ वर अ.क्र.१ अंतर्गत सदरकामी र.रू.९९,८६,९७,५००/- इतकी तरतूद "पाणीपुरवठा विशेष योजना निधी या लेखाशिर्ष अंतर्गत अ.क्र.१ – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक (Source) स्त्रोत निश्चित करणे. त्यातील पाणी साठा आरक्षित करणे व तदनुषंगिक कामे करणे" याकामाअंतर्गत करण्यात आली आहे. तरी,

वरील नमूद प्रमाणे आंद्रा धरणातून ३६.८७ दलघमी पाणी आरक्षणापोटी सिंचन पुनर्स्थापनेसाठी र.रु.१००,८०,२५,८५६/- पैकी (शासन निर्णयातील अ.क्र.६ आणि प्रदेश कार्यालयाचे ज्ञापन नुसार महानगरपालिकेस सिंचन पुनर्स्थापना खर्च एक रकमी भरणे बंधनकारक करणे ऐवजी सन २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षात टप्प्याटप्प्याने घेण्यात यावा असे नमूद आहे) सन २०१९-२० साठीच्या दुस-या टप्प्यात सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी र.रु.२०,१६,०५,१७२/-(अक्षरी रक्कम् रुपये वीस कोटी सोळा लाख पाच हजार एकशे बहात्तर फक्त) चा धनादेश कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०१६ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/भांडार/६/कावि/९२/२०२०, दि.११/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ICU व NICU विभागातील Ventillator करिता Flow Sensor व O2 Cell खरेदी करणेकामी संबंधित उत्पादित कंपनीचे अधिकृत वितरक में.श्री कन्स्ट्रक्शन, निगडी यांनी सादर केलेले एकूण र.रु.७,४५,९२०/- चे दरपत्रक स्विकृत करणेत आले आहे. त्यानुसार ICU व NICU विभागातील Ventillator करिता Flow Sensor व O2 Cell खरेदी करणेकामी संबंधित उत्पादित कंपनीचे अधिकृत वितरक में.श्री कन्स्ट्रक्शन, निगडी यांचेकडून त्यांनी सादर केलेले दरपत्रक एकूण र.रु.७,४५,९२०/- (सर्व करांसहित) नुसार निविदा न मागवता, करारनामा करुन मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५(२)(२) नुसार थेट पध्दतीने करण्यास व सदर खरेदीकरणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.७,४५,९२०/- (सर्व करांसहित) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०१७ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/७/कावि/२०१/२०२०, दि.१२/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात रूग्णाचा वाढता व्याप विचारात घेता रूग्णालयमध्ये रूग्णांचे सोईचे दृष्टीने नविन विभाग सुरू करणेत येणार आहेत. त्याकरीता खालील प्रमाणे आवश्यक वाढीव स्टाफनर्स पदे भरणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **नविन सुरू करणेचे विभाग** | **आवश्यक स्टाफनर्स** | **उपलब्ध स्टाफनर्स** | **मागणी संख्या** |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | एन.आय.सी.यु (३० बेड) | ३७ | १८ | १९ |
| २ | पी.आय.सी.यु (१० बेड) | १२ | - | १२ |
| ३ | तातडीक बालरोग विभाग सीएमओ | ०६ | - | ०६ |
| ४ | आय.सी.यु-१ | २५ | - | २५ |
| | **एकूण** | **८०** | **१८** | **६२** |

उपरोक्त आवश्यक आसणारी वाढीव स्टाफनर्स पदे ही दि.०६/०१/२०२० रोजी घेतलेल्या लेखीपरिक्षेमध्ये पात्र ठरलेल्या १८९ पात्र उमेदवारांमधून यापुर्वी उक्त आदेशान्वये ६४ उमेदवारांना नियुक्ती दिलेली आहे. या व्यतिरिक्त शिल्लक पात्र उमेदवारांमधून उक्त वाढीव ६२ स्टाफनर्स पदे पुढील सहा महिनेकालावधीकरीता भरावी लागणार आहेत. सदर नव्याने वाढीव ६२ स्टाफनर्स पदे भरणेस व त्याकरीता येणा-या मानधन खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०१८ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – नागरवस्ती विकास योजना
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/४/कावि/१७५/२०२०, दि.१३/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाअंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक १०६२, दि.२०/०१/२०११ अन्वये अपंग विकासाच्या योजना क्र.१३ अन्वये सुरू करण्यास तसेच विद्यार्थाबरोबरच शहरातील ४०% पेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या पिंपरी चिंचवड शहरातील सर्व ठिकाणच्या अपंग, कर्णबधीर व १००% अंध नागरिकांना पी.एम.पी.एम.एल.चा मोफत पास सर्व ठिकाणी देण्यास मान्यता देणेत आलेली आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये जाहीर प्रकटनाद्वारे दिव्यांग कल्याणकारी योजना महापालिका हद्दीतील अंध निसमर्थ (अपंग) कर्णबधिर, मतिमंद व्यक्तींना पीएमपीएमएल चे मोफत बस पाससाठी अर्ज मागविणेत आले होते. त्यानुसार परिवहन मंडळाकडून माहे ३१ जानेवारी २०२० पर्यंत एकूण ३१५१ पासेस वितरीत करण्यात आलेले आहेत. सदर पासेसची र.रू.४,८५,८९,३५२/- (अक्षरी र.रु.चार कोटी पंच्याऐंशी लाख एकोणनव्वद हजार तीनशे बावन्न फक्त) इतकी होत आहे. यापैकी सदर संस्थेच्या दि.२३/०९/२०१९ च्या पत्रातील मागणीनुसार मा.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र.नावियो/४/कावि/४७८/२०१९, दि.४/१०/२०१९ अन्वये र.रु.३,००,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन कोटी फक्त) (७५%) रक्कम, आगाऊ स्वरुपात अदा करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांना दि.३/२/२०२० रोजीचे पत्रान्वये मोफत बसपासेस बिलापोटी उर्वरीत रक्कम रुपये सदर र.रू.१,८५,८९,३५२/- (अक्षरी र.रु.एक कोटी पंच्याऐंशी लाख एकोणनव्वद हजार तीनशे बावन्न फक्त) बिल रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७०१९ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/४/कावि/१७६/२०२०, दि.१३/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांग कल्याणकारी योजने अंतर्गत समाजातील कमजोर वर्ग म्हणून ओळखले जाणारे घटक म्हणजे दिव्यांग व्यक्ती तृतीयपंथी व्यक्ती अथवा अत्याधिक गरीब यांचे कल्याण, पुनर्वसन आणि या घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणेसाठी जे काही कायदे आणि न्यायिक आदेश उपलब्ध आहेत त्यांच्या आधारे या कमजोर घटकांना सशक्त करण्यासाठी सर्व समावेशक कृती आराखडा करणे आवश्यक आहे. यासाठी विविध राज्यांच्या सामाजिक धोरण तयार करणा-या समित्यांवर काम केलेले आणि सद्यस्थितीत अशा अनेक राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय समितीवर काम करणारे श्री.समीर घोष यांची या उपक्रमासाठी सल्लागार म्हणुन मा. स्थायी समिती ठराव क्र.३९४७ दि.०४/०१/२०१९ अन्वये नियुक्ती करणेस मान्यता देणेत आलेली आहे. सदर नियुक्ती आदेश क्र.नावियो/४/कावि/८७/२०१९, दि.१८/०२/२०१९ अन्वये १ वर्ष कालावधीसाठी करणेत आलेली आहे. सदरची मुदत दि. १८/२/२०१९ ते १७/२/२०२० अखेर पर्यंत असुन आता सदरची मुदत संपत आलेली आहे. श्री. समीर घोष यांनी सदरचे कामकाज व्यवस्थितरित्या पार पाडले असून त्याबाबतचा सविस्तर अहवाल त्यांनी दिनांक २९/११/२०१९ चे पत्रानुसार या कार्यालयास सादर केला असून सदर अहवाल प्रपत्र “अ” नुसार सोबत सादर केला आहे. तसेच दिनांक २९ नोव्हेंबर २०१९ चे पत्रानुसार त्यांनी एक ते दोन वर्षाकरीता सध्याचे मानधन रकमेमध्ये १०% ते १५% वाढ करुन मुदतवाढ देणेकामी विनंती केली आहे. त्यानुसार समाजातील कमजोर वर्ग म्हणून ओळखले जाणारे घटक म्हणजे दिव्यांग व्यक्ती, तृतीयपंथी व्यक्ती अथवा अत्याधिक गरीब यांचे कल्याण, पुनर्वसन आणि या घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणेसाठी श्री.घोष यांची मुदतवाढ करणे आवश्यक असून दिनांक १८/०२/२०२० पासून दोन वर्ष कालावधीकरीता आणि प्रतिदिन र.रू.१६,५००/- या दराने प्रत्येक महिन्यातील १० दिवसांचे कामकाजाकरीता याप्रमाणे र.रु.१,६५,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख पासष्ठ हजार फक्त) मानधन रक्कम निश्चित करुन त्यानुसार श्री.समीर घोष यांची सामाजिक समावेशन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देणेकामी तसेच याकामी दोन वर्ष कालावधीकरीता येणा-या र.रु.३९,६०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणचाळीस लाख साठ हजार फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०२० विषय क्रमांक – १५

दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – माध्यमिक शिक्षण

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/५३/२०२०, दि.१३/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माध्यमिक शिक्षण विभागाकडील "बोनस व सानुग्रह अनुदान" या लेखाशिर्षकावर असलेल्या र.रू.२,२५,००,०००/- या लेखाशिर्षातुन र.रू.१०,००,०००/- अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षवर तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/४९५/२०२०
दिनांक – ०८/०५/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाही

**(क्र.कक्षे/लेखा/नि.क./१५/कावि/७२/२०२० दि.११/३/२०२० विषय क्र.५ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८ क क्षेत्रीय कार्यालय
क्रं.कक्षे/लेखा/नि.क./१५/कावि/७२/२०२०.
दिनांक - ११/०३/२०२०.

प्रपत्र अ (1 ते 3)

| क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रं. | कामाचे नाव | करारनामा केलेली दिनांक | कामाचे आदेश क्रं. | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळुन निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा बयाणा मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| 1 | मे. व्हि.ए.झोंबाडे | 3/1/2019-20 | प्रभाग क्रं. ६ मध्ये रस्त्यांना थर्मोप्लास्ट पेंट देणे व दिशादर्शक बोर्ड बसविणे. | 06/02/2019 | क्रं.कक्षे/निक/15/कावि/47/2020 | 14/02/2020 | 577438 | 535738 | 4940 | 36760 | 27.36 % कमी | 430860 |
| 2 | मे. व्हि.ए.झोंबाडे | 3/2/2019-20 | प्रभाग क्रं. ६ मध्ये दिशादर्शक बोर्ड बेंचेस व चाचनालय विषयक कामे करणे. | 06/02/2020 | क्रं.कक्षे/निक/15/कावि/46/2020 | 14/02/2020 | 576490 | 519301 | 10879 | 46310 | 25.10 % कमी | 446145 |
| 3 | मे. पुनम एंटरप्रायजेस | 3/6/2019-20 | प्र.क्र. ६ मध्ये सदगुरुनगर, लांडगेवस्ती, चक्रपाणी वसाहत व परिसरात खडडे व चरांची डांबरीकरणाने दुरुस्ती करणे. | 11/02/2020 | क्रं.कक्षे/निक/15/कावि/69/2020 | 03/03/2020 | 576292 | 463179 | 3534 | 109580 | 13.93 % कमी | 511772 |
| | | | | | | | | | | | **एकुण -** | 1388777 |

क्षेत्रीय अधिकारी
क क्षेत्रीय कार्यालय

(१८)

## (क्र.कक्षे/लेखा/नि.क./१५/कावि/७१/२०२० दि.११/३/२०२० विषय क्र.६ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८ क क्षेत्रीय कार्यालय
क्रं.कक्षे/लेखा/नि.क./१५/कावि/ ७१/२०२०.
दिनांक - ११/०३/२०२०.

प्रपत्र अ ( 1 ते 2 )

| क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रं. | कामाचे नाव | करारनामा केलेली दिनांक | कामाचे आदेश क्रं. | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा बयाणा मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | १२ | १३ |
| 1 | मे. एसीई कम्युनिकेशन | 2/6/2019-20 | क प्रभागातील मनपा इमारती मधील EPABX यंत्रणेची सन २०१९ - २० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. | 20/02/2020 | क्रं.कक्षे/निक/15/कावि/68/2020 | 03/03/2020 | 446422 | 10.75 % कमी + G.S.T. | 398432 |
| 2 | मे. इलेक्ट्रो टेक इजिं. & कॉन्ट्र. प्रा.लि. | 2/20/2019-20 | प्र. क्र. ९ मधील रस्त्यावरील दिव्यांच्या नादुरुस्त केबलची सन २०१९ - २० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. | 20/02/2020 | क्रं.कक्षे/निक/15/कावि/67/2020 | 03/03/2020 | 267854 | 28.02 % कमी + G.S.T. | 192801 |
| | | | | | | | | एकुण | 591233 |

क्षेत्रीय अधिकारी
क क्षेत्रीय कार्यालय

(८)

**(क्र.डक्षे/३/कावि/५६/२०२० दि.११/३/२०२० विषय क्र.७ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी -17

(विषयपत्र क्र.डक्षेका/नि-3/कावि/ ५६ /2020 दि. ११ /03/2020 लगत

प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. शुभम इलेक्ट्रीकल्स् अँड इलेव्हेटरर्स | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/1-2019-20 | ड प्रभाग अंतर्गत वाकड उपविभागांतर्गत नादुरूस्त एलईडी फिटींगची दुरूस्ती करणे व बदलणे. 2019/20 | 01/02/2020 | डक्षेका/03/कावि/33/2020 | 07/02/2020 | 224946 | -16.10 | % कमी | 188730 |
| 2 | मे. विमलाई इलेक्ट्रीक कारपोरेशन | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/2-2019-20 | ताथवडे, पुनावळे व वाकड उपविभागातील शाळा इमारती मध्ये विद्युतविषयक देखभाल दुरूस्ती करणे 2019/20 | 31/01/2020 | डक्षेका/03/कावि/35/2020 | 07/02/2020 | 299640 | -18.21 | % कमी | 245076 |
| 3 | मे.मिहीर एंटरप्राजेस | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/3-2019-20 | ड प्रभाग अंतर्गत सर्व मनपा इमारतीत वातानुकुलन यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे. २०१९-२० | 01/02/2020 | डक्षेका/03/कावि/49/2020 | 04/03/2020 | 467677 | -17.45 | % कमी | 386067 |
| 4 | मे. शुभम इलेक्ट्रीकल्स् अँड इलेव्हेटरर्स | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/4-2019-20 | सन २०१८-१९ करीता ड क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील उद्यानांतील विद्युत यंत्रणेची देखभाल दुरूस्ती करणे | 01/02/2020 | डक्षेका/03/कावि/34/2020 | 07/02/2020 | 713766 | -26.15 | % कमी | 527116 |
| 5 | मे. मोरया मंडप डेकोरेटर्स | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/5-2019-20 | ड क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील ताथवडे, पुनावळे, वाकड, पिंपळे निलख, पिंपळे सौदागर व पिंपळे गुरव या परिसरांतर्गत अचानक होणा-या विविध कार्यक्रमांकरीता तात्पुरत्या स्वरुपाची ध्वनिक्षेपण, CCTV, जनरेटर्स व प्रकाश व्यवस्था करणे. 2019-20 | 18/02/2020 | डक्षेका/03/कावि/50/2020 | 04/03/2020 | 847398 | -1.70 | % कमी | 832992 |
| | | | | | | | | एकुण | | 2179981 |

प्र. सहा. आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी पुणे 17
पिंपरी चिंचवड महानगरपालिका